संगणक शास्त्र प्रशाळा

लोकमत



विद्यापीठात सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधताना धनराज बोंडे व मानसी.

# विद्यापीठात सायबर सुरक्षेवर जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** सध्या सायबर क्राईमच्या घटना वाढल्या आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी व विद्यार्थिनींमधील सजगता वाढावी, यासाठी कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांकडून सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली.

विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सायबर सुरक्षेबाबत जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. १ नोव्हेंबर २०२२ रोजी एमबीएच्याच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबद्दल माहिती दिली.

संगणकशास्त्र प्रशाळेचे विद्यार्थी जय पंडित व भावेश थोरात यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. धनराज बोंडे व मानसी बोरोले यांनी सायबर सुरक्षेबद्दल संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. मनिष जोशी, समन्वयक प्रा. राजू आमले, प्रा. सुरेंद्र कापसे व महेश भर्डी आदी उपस्थित होते.